# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष १, अंक १७] शुक्रवार, जुलै ३१, २००९/श्रावण ९, शके १९३१ [ पृष्ठे ५, किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक ३७


## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**— राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांसाठीच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अध्यादेश .. .. | १-५ |


## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै २००९.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2009.

AN ORDINANCE

TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS OF THE MAYOR AND THE DEPUTY MAYOR OF CERTAIN MUNICIPAL CORPORATIONS AND THE PRESIDENT AND THE VICE-PRESIDENT OF CERTAIN MUNICIPAL COUNCILS TEMPORARILY ON ACCOUNT OF ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY.

**सन २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ११.**

**राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांसाठीच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका ऑक्टोबर, २००९ या महिन्यात केव्हातरी घेण्यात येण्याची शक्यता आहे ;

**आणि ज्याअर्थी**, विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधीदेखील ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २००९ या महिन्यांत समाप्त होणार आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांचा सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच जिल्ह्यांमधील पोलीस कर्मचारी वर्ग, महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या तयारीमध्ये कार्यव्यग्र आहे, आणि तो, निवडणूकपूर्व व निवडणुकीनंतरच्या कामामध्ये पूर्णपणे व्यस्त राहणार आहे ;

**आणि ज्याअर्थी**, उक्त निवडणुकांची कोणतीही संभाव्य परस्परव्याप्ती टाळण्यासाठी आणि नागरी व पोलीस प्रशासन यावरील कोणताही संभाव्य अवास्तव ताण आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही समस्या किंवा नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी, विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका चार महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे असे वाटते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त कारणांसाठी विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांसाठीच्या निवडणुका पुढे ढकलण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २००९ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

व्याख्या. **२.** या अध्यादेशात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " महानगरपालिका " याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम, किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये घटित केलेली महानगरपालिका, असा आहे ; १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

१९६५ चा महा. ४०.

(ख) " नगरपरिषद " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ या अन्वये घटित केलेली नगरपरिषद असा आहे ;

(ग) महानगरपालिकेच्या संबंधात " संबद्ध अधिनियम " याचा अर्थ, उपरोक्त खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला संबद्ध अधिनियम आणि नगरपरिषदेच्या संबंधात " संबद्ध अधिनियम " याचा अर्थ, उपरोक्त खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला संबद्ध अधिनियम, असा आहे ;

(घ) या अध्यादेशात वापरलेले परंतु, येथे व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, संबद्ध अधिनियमांमध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

महापौर, उप महापौर, अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांसाठी निवडणुका पुढे ढकलणे व त्यांचा पदावधी वाढविणे.

**३.** (१) संबद्ध अधिनियमामध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्याय निर्णयामध्ये, हुकुमनाम्यामध्ये किंवा आदेशामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत किंवा राज्य शासन **राजपत्रामध्ये** अधिसूचित करील अशा, त्या आधीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत (या अध्यादेशात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा केला आहे), महानगरपालिकेचे महापौर व उप महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांसाठी, कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ख) उक्त कालावधीनंतर निवडून द्यावयाच्या महापौर व उप महापौर आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी हा, निर्वाचित पालिका सदस्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होणारा असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महापौर व उप महापौर आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष त्यांचा या अध्यादेशाद्वारे वाढविलेला पदावधी समाप्त झाल्यानंतरही, संबद्ध अधिनियमान्वये नवीन महापौर किंवा उप महापौर किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडून येईपर्यंत, पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असेल अशा महापौर, उप महापौर, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अधिकार आणि विवक्षित कृतींचे विधिग्राह्यीकरण.

**४.** ज्याचा पदावधी कलम ३ अन्वये वाढविण्यात आला असेल किंवा यथास्थिती, वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल असे महानगरपालिकांचे सर्व महापौर व उप महापौर आणि नगरपरिषदांचे सर्व अध्यक्ष आणि उपाध्यक्ष, अशा वाढविण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीत असे महापौर व उप महापौर आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यास व सर्व कार्ये पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व ते सक्षम असतील ; आणि उक्त कालावधीमध्ये त्यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही कृती, वाढविण्यात आलेल्या कालावधीत अशा महापौरांना व उप महापौरांना आणि अध्यक्षांना व उपाध्यक्षांना संबद्ध अधिनियमाखालील महापौरांच्या व उप महापौरांच्या आणि अध्यक्षांच्या व उपाध्यक्षांच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करता आला नव्हता, सर्व किंवा कोणत्याही कर्तव्याचे पालन करता आले नव्हते किंवा सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडता आली नव्हती, याच केवळ कारणावरून अवैध ठरणार नाही किंवा त्या कृतीस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

महापौर, उप महापौर, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका घेण्याची व्यवस्था.

५. या अध्यादेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या अध्यादेशाद्वारे वाढविलेला विद्यमान महापौरांचा व उप महापौरांचा आणि अध्यक्षांचा व उपाध्यक्षांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, संबंधित अधिकाऱ्यांकडून संबद्ध अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या तरतुदींनुसार, महानगरपालिकेच्या महापौर व उप महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका घेण्याची व्यवस्था करण्यात येईल.

अडचण दूर करणे.

६. या अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अध्यादेशात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत संबद्ध अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, अडचण दूर करण्यासाठी, आदेशाद्वारे त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

## निवेदन

राज्यातील नगरपालिका कायद्यांच्या विद्यमान तरतुदींनुसार, महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर यांचा आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी अडीच वर्षांचा आहे. काही महानगरपालिकांमधील महापौर व उप महापौर यांचा पदावधी आणि काही नगरपरिषदांमध्ये अध्यक्ष व उपाध्यक्षांचा पदावधी ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर २००९ मध्ये समाप्त होणार आहे.

राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका २००९ च्या ऑक्टोबर महिन्यामध्ये केव्हातरी घेण्यात येण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या उक्त सार्वत्रिक निवडणुकांमुळे, जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांचा सर्व अधिकारी व कर्मचारीवर्ग तसेच जिल्ह्यांमधील पोलीस कर्मचारीवर्ग उक्त सार्वत्रिक निवडणुकांच्या तयारीमध्ये कार्यव्यग्र आहे, आणि तो , निवडणुकपूर्व व निवडणुकीनंतरच्या कामामध्ये पूर्णपणे व्यस्त राहणार आहे. उक्त निवडणुकांची कोणतीही संभाव्य परस्पर व्याप्ती टाळण्यासाठी आणि नागरी व पोलीस प्रशासन यावरील कोणताही संभाव्य अवास्तव ताण आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत कोणतीही समस्या किंवा नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी, महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर यांच्या आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका चार महिन्यांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या पुढे ढकलणे इष्ट आहे असे वाटते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे व अन्य विवक्षित तदानुषंगिक बाबींसाठी विवक्षित महानगरपालिकांचे महापौर व उप महापौर यांच्या आणि विवक्षित नगरपरिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक ३१ जुलै २००९.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**मनुकुमार श्रीवास्तव,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ३० ] शुक्रवार, जुलै ३१, २००९/श्रावण ९, शके १९३१ [ पृष्ठे ५, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्र. ५७

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils Temporary Postponement of Elections (of the Mayors and the Deputy Mayors of certain Municipal Corporations and the Presidents and the Vice-Presidents of certain Municipal Councils due to ensuing general elections to the State Legislative Assembly) Ordinance, 2009 (Mah. Ord. XI of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils Temporary Postponement of Elections (of the Mayors and the Deputy Mayors of certain Municipal Corporations and the Presidents and the Vice-Presidents of certain Municipal Councils due to ensuing general elections to the State Legislative Assembly) Ordinance, 2009 (Mah. Ord. XI of 2009), published under the authority of the Governor.]

---

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st July 2009.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2009.**

*AN ORDINANCE*

*to provide for temporary postponement of elections of the Mayor and the Deputy Mayor of certain Municipal Corporations and the President and Vice-President of certain Municipal Councils temporarily on account of ensuing general elections to the State Legislative Assembly.*

WHEREAS general elections to the State Legislative Assembly are likely to be held sometime in the month of October 2009;

AND WHEREAS the term of the offices of the Mayor and the Deputy Mayor of certain Municipal Corporations and the President and the Vice-President of certain Municipal Councils are also due to expire in the months of August, September and October 2009 ;

AND WHEREAS on account of ensuing general elections to the Maharashtra Legislative Assembly, all the Officers and staff of the Collectors of the Districts as well as the police personnel in the Districts are busy with the preparation for the ensuing general elections of the Maharashtra Legislative Assembly and would be totally occupied with pre and post election duties ;

AND WHEREAS to rule out any possible overlapping of the said elections and any possible undue pressure on civil and police administration and any law and order problem, or any inconvenience to citizens, it is considered expedient to temporarily postpone the elections of the Mayor and the Deputy Mayor of certain Municipal Corporations and the President and the Vice-President of certain Municipal Councils for a period of four months ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that cirumstances exist which render it necessary for him to take immediate action to provide for temporary postponement of elections of the Mayor and the Deputy Mayor of certain Municipal Corporations and the President and the Vice-President of certain Municipal Councils for the reasons aforesaid;

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils Temporary Postponement of Elections (of the Mayors and the Deputy Mayors of certain Municipal Corporations and the Presidents and the Vice-Presidents of certain Municipal Councils due to ensuing general elections to the State Legislative Assembly) Ordinance, 2009.

(*2*) It shall come into force at once.

Definitions.

**2.** In this Ordinance, unless the context otherwise requires,—

(*a*) " Municipal Corporation " means a Municipal Corporation constituted under the Mumbai Municipal Corporation Act, or the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, or the City of Nagpur Corporation Act, 1948 ;

Bom. III of 1888. Bom. LIX of 1949.

C.P. and Berar II of 1950. Bom. XL of 1965.

(*b*) " Municipal Council " means a Municipal Council constituted under the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships Act, 1965 ;

(*c*) " relevant Act " in relation to a Municipal Corporation, means the relevant Act referred to in cluase (*a*) above and the " relevant Act " in relation to a Municipal Council, means the relevant Act referred to in clause *(b)* above ;

(*d*) words and expressions used in this Ordinance and not defined herein shall have the meanings assigned to them in the relevant Act.

Post-ponement of elections of Mayors, Deputy Mayors and Presidents and Vice-Presidents and extension of term of their office.

**3.** (*1*) Notwithstanding anything contained in the relevant Act or the rules made thereunder or in any Judgment, decree or order of any Court,–

(*a*) no election to the office of the Mayor and the Deputy Mayor of the Municipal Corporation and the President and the Vice-President of the Municipal Council shall be held for a period of four months from the date of coming into force of this Ordinance or such earlier date as may be notified by the State Government (hereinafter in this Ordinance referred to as "the said period") ;

(*b*) the term of the offices of the Mayor, the Deputy Mayor and the President and the Vice-President to be elected after the said period shall be co-terminus with the term of the elected Councillors.

(*2*) Notwithstanding anything contained in sub-section *(1)*, after the term of the Mayor, the Deputy Mayor and the President and the Vice-President as extended by this Ordinance expires, they shall continue to hold office until the new Mayor or Deputy Mayor or President or Vice-President has been elected under the relevant Act.

Powers of Mayor, Deputy Mayor and President and Vice-President whose term of office stands extended and validation of certain Acts.

**4.** All the Mayors and the Deputy Mayors of the Municipal Corporations and the Presidents and the Vice-Presidents of the Municipal Councils, whose term of office is deemed to have been extended or is extended, as the case may be, under section 3, shall, throughout such extended period, be deemed to have been and be competent to exercise all the powers, perform all the duties and discharge all the functions as such Mayor, Deputy Mayor and President and Vice-President; and no Act done by any of them during the said period shall be invalid, or shall be called in question in any Court, merely on the ground that during the extended period such Mayor, Deputy Mayor and President and Vice-President could not exercise all or any of the powers or perform all or any of the duties or discharge all or any of the functions of the Mayor, the Deputy Mayor and the President and the Vice-President under the relevant Act.

Arrangements to hold elections of Mayors, Deputy Mayors and Presidents and Vice-Presidents.

**5.** Notwithstanding anything contained in this Ordinance, arrangements shall be made by the Officers concerned to hold the elections of the Mayor and the Deputy Mayor of the Municipal Corporations and the President and the Vice-President of the Municipal Councils, in accordance with the provisions of the relevant Act, and the rules thereunder, before, or as soon as possible, after the expiration of the term of office of the existing Mayor, Deputy Mayor and President and Vice-President which stands extended by this Ordinance.

Removal of difficulty.

**6.** If any difficulty arises in giving effect to the provisions of this Ordinance by reason of anything contained therein, or in giving effect to the provisions of the relevant Act in respect of any matter contained in this Ordinance, the State Government may, as occasion arises, by order, do anything which appears to it to be necessary for the purpose of removing the difficulty.

STATEMENT

As per the existing provisions of the Municipal Laws in the State, the tenure of the offices of the Mayor and the Deputy Mayor of the Municipal Corporations and the President and the Vice-President of the Municipal Councils is two and a half years. In some of the Municipal Corporations, the term of the offices of the Mayors and the Deputy Mayors and in some of the Municipal Councils, the term of office of the President and the Vice-President is due to expire in the months of August, September and October 2009.

The general elections to the State Legislative Assembly are likely to be held sometime in the month of October 2009. On account of the said general elections to the Maharashtra Legislative Assembly, all officers and staff of the Collectors of the Districts as well as the police personnel in the Districts are busy with preparation for the said general elections and would be totally occupied with the pre and post election duties. To rule out any possible overlapping of the said elections and any possible undue pressure on civil and police administration and any law and order problem or any inconvenience to citizens, it is considered expedient to temporarily postpone the elections of the Mayors and the Deputy Mayors of the Municipal Corporation and the Presidents and the Vice-Presidents of the Municipal Council for a period of four months.

2. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to provide for temporary postponement of elections to the offices of the Mayor and the Deputy Mayor of certain Municipal Corporations and the President and the Vice-President of certain Municipal Councils, for a short period, on account of ensuing general elections to the State Legislative Assembly and for certain other incidental matters, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 31st July 2009.

S. C. JAMIR,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANU KUMAR SHRIVASTAV,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष १, अंक ३१ ] मंगळवार, ऑगस्ट ४, २००९/श्रावण १३, शके १९३१ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ५८


## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

### *ERRATUM*

In the English translation of the Maharashtra Municipal Corporations and Municipal Councils Temporary Postponement of Elections (of the Mayors and the Deputy Mayors of certain Municipal Corporations and the Presidents and the Vice-Presidents of certain Municipal Councils due to ensuing general elections to the State Lesiglative Assembly) Ordinance, 2009 (Mah. Ord. XI of 2009), published in the *Maharashtra Government Gazette,* Extraordinary, Part VIII, dated the 31st July 2009, at pages 1-5, on page 3, in the marginal note *for* "Bom. XL of 1965" *read* "Mah. XL of 1965".




ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.